# आवाहन

श्री गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठानच्या जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स चे सर्व प्राध्यापक, प्रध्यापिकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि विद्यार्थीनींनों आपणास नम्र आवाहन करताना आज जगात कोविड-१९ ने आहा:कार उडविला असून भारत देशासह आपला महाराष्ट्र देखील या भयंकर संकटाला गेली जवळपास दीड महिना सामोरे जात आहे. हे अतिशय महानक मोठे संकट समोर आले असताना आपण प्रत्येकाने काही काळजी व जबाबदारीने वागले पाहिजे.

**“मंगल देशा...पवित्र देशा... दगडांच्या देशा**
**प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा "**

असे सुंदर वर्णन महाराष्ट्राचे कविवर्य गोविंदाग्रजानी केलेले आहे. महाराष्ट्र ही प्रज्ञा वंतांची भूमी, महाराष्ट्र ही युग पुरुषांची भूमी, महाराष्ट्र ही साधुसंतांची पवित्र भूमी, अशा या महाराष्ट्र देशावर करोना सारखे दुर्दैवी संकट उभे राहिलेले आहे. अशावेळी शासन आणि प्रशासनाला आपण सर्वांनी सर्वतोपरी सहकार्य करताना यांच्या आदेशांचे - नियमांचे पालन करून हे करोना चे युद्ध आपण जिंकले पाहिजे. या रणभूमीवर आपलाच विजय झाला पाहिजे. त्यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी आपण केल्या पाहिजेत. उदाहरणार्थ:- सर्दी, ताप, खोकला वगैरे आजार जाणवल्यास ताबडतोब नजीकच्या हॉस्पिटलमध्ये तपासणी करून घेणे, मास्क वापरणे सॅनिटायझरचा उपयोग करणे, सोशल डिस्टन्सचा योग्य उपयोग करणे, जास्तीत जास्त वेळ घरातच बसणे, उगाचच इतरत्र फिरू नये, हात वगैरे धुण्यासाठी डेटॉल चा उपयोग करणे यासह **डॉक्टर्स, आरोग्य कर्मचारी, नर्स, सफाई कामगार, पोलीस यांच्यासह अत्यावश्यक सेवेतील शासकीय कर्मचारी यांना जरूर पडल्यास योग्य ती मदत करून राष्ट्र सेवेसाठी पुढाकार घेणे.**

आज गेले दीड महिने या महाभयंकर संकटाशी आपण सारेजण तीव्रतेने लढा देत आहोत. दिवसेंदिवस रुग्ण संख्या वाढत आहे. अशावेळी आपण न घाबरता आलेल्या संकटाला सामोरे जात कोरोनाव्हायरस पळवून लावण्यासाठी कटिबद्ध होऊ या.

आपले कर्तव्य म्हणून आपण सर्वांनी स्वतःला - कुटुंबियांना - नातेवाईकांना - हितचिंतक - मित्रपरिवार या सह समाजातील विविध घटकांना आपण योग्य मार्गदर्शन करून सर्वांनी काळजी घ्यावी. **धीर न सोडता एका धैर्याने या करोना संकटाला सामोरे जाऊया आणि शासनाच्या प्रशासनाच्या नियमांचे तंतोतंत पालन करून त्यांनाही सहकार्य करूया. त्यासाठी घाबरण्याचे कारण नाही. धैर्याने लढा. कोरोना सारखे संकट सहज पळून जाईल याचा आत्मविश्वास बाळगा.**

पुन्हा सर्वांना या गोष्टींचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी आवाहन करतो.

**“जय महाराष्ट्र"**

**संस्थापक**
श्री. गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठान